ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 10 | JUNE - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# धनगर समाजाची लोककला




**श्रीकांत सिध्दाप्पा कुरणे**
**मु.पो.बोरगाव ता.वाळवा , जि. सांगली.**

## प्रस्तावना -

प्राचीन काळापासून पशुपालन करणारा समाज म्हणजे धनगर समाज होय. .आपल्या पशुपालन व्यवसायामुळे सर्वत्र पसरलेला व तेथील भाषेनुसार वेगवेगळ्या नावाने ओळखला जाणारा समाज म्हणजे धनगर समाज होय. धनगर समाजाची सिद्धपरंपरा प्रसिद्ध आहे. हलामत हे धनगर समाज भगवद्गीतेप्रमाणे मानते. महाराष्ट्रावर सत्ता गाजवणारे सातवाहन हे मूळचे धनगर होते तर देवगिरीचे यादव हे मूळचे अहिर गवळी होय. तेरावा शतकापर्यंत धनगर गवळी समाजानेच महाराष्ट्रावर सत्ता गाजवली व एक संस्कृती निर्माण केली. आजही महाराष्ट्र या संस्कृतीचे अनुसरण करत आहे. या समाजाने आपली नृत्य गाणी यातून आपली संस्कृती व लोककला जिवंत ठेवली आहे.

## * गजानृत्य ( गजीढोल) धनगरी नृत्य प्रकार

गजानृत्य हे धनगर समाजाचे लोक नृत्य आहे. गजानृत्य या शब्दाची फोड केली असता गज म्हणजे हत्ती, या नृत्यप्रकाराचे स्वरूप बघितले असता हत्ती जसा एकाच ठिकाणी उभा राहून डुलत डुलत असतो. त्याप्रकारे या नृत्याचे साधारण स्वरूप असते. धनगर समाजाबद्दल जाणकारांनी एक निकष मांडला आहे. तो असा- हा समाज मुखत्वे शेळ्या-मेंढ्या पाळून त्यावर आपली उपजीविका करण्याच्या निमित्ताने अगदी गोकुळ, वृंदावन आणि मथुरेहून गुजरातेत आले आणि तेथून महाराष्ट्रात उतरले. त्यामुळे या गजानृत्यात या ठिकाणच्या पारंपरिक नृत्याची झलक आपणास बघावयास मिळते.

गजानृत्य हे इतर लोककलेप्रमाणे संशोधनाचा विषय ठरले आहे. यातील कथा व गाणी आता आधुनिक तिकडे वळताना दिसतात. गजानृत्य ठराविक पद्धतीने पदन्यास अजूनही बदलला नाही. आधुनिकीकरणामुळे गजनृत्यातील गाणीही देवतांपर्यंत मर्यादित न राहता भारतीय स्वातंत्र्य चळवळ ,देशभक्ती, देशनिष्ठा यांचे महत्त्व देखील या गाण्यातून व्यक्त होत आहे.

## • सांगोला तालुक्यात गजीढोल नृत्य

सांगोला तालुक्यात गजीढोल नृत्य लोकप्रिय आहे. धनगर लोक गजी नावाचे नृत्य करतात. ते त्यावेळी जोरजोराने ढोल वाजवतात. नृत्य करणाऱ्यास गजी म्हणतात. ढोल वाजवणाऱ्यास ढोल्या म्हणतात. त्यामुळे ते लोकनृत्य तालुक्यात गजीढोल या नावाने प्रसिद्ध आहे. तालुक्यात गजीढोलाची दीड-दोनशे वर्षांची परंपरा आहे. बिरोबा, खंडोबा, भैरोबा, सिध्दनाथ, वेताळ या ग्रामदेवतांचा उपासनाविधी, कुळाचार म्हणून, नवसफेडी म्हणून गजीढोल घालण्याची प्रथा आहे.

गजीढोल नृत्यामध्ये गजी वर्तुळाकार नाच करतात. सर्व नर्तक डावा पाय पुढे टाकून एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून किंवा कंबरेवर हात लपेटून वर्तुळात उभे राहतात. रंगीत रुमाल किंवा पटक्याचा शेमला उडवत डाव्या-उजव्या बाजूला वळत तालबध्द नृत्य करतात. नृत्यात पंचवीस ते तीस लोकांचा सहभाग असतो. त्यांचा पोषाख गुडघ्यापर्यंत विजार घातलेली असते. अंगात नेहरु शर्ट, डोक्यावर तुरा काढलेला फेटा, दोन्ही हातांत रुमाल, कमरेलाही रंगीत रुमाल खोचलेला असा असतो. तालुक्याच्या काही भागांत त्यास चुळण असे म्हणतात.

ढोल, सनई, सूर, शिंगतुतारी, कोटंबा, झांज, परडी इत्यादी साहित्य (अथवा वाद्ये) नृत्यासाठी वापरले जाते. नृत्याच्या एकूण पन्नास ते पंचावन्न प्रकारांपैकी उपलब्ध असलेल्या नऊ-दहा प्रकारांना घाय असे म्हणतात. धनगरी घाय, कापसी घाय, थोरली घाय, गळा मिठी घाय, रिंगन घाय, घोड घाय, टिपरी घाय, कोंडीबाची घाय, दुपारतीची घाय, इत्यादी. एक घाय बारा ते पंधरा मिनिटे चालते. नृत्य तीन तास चालत असते .गजीढोल नृत्यात विविध जातींतील लोकांकडे वाद्याचा मान असतो.

- **गोव्यातील गजानृत्य**

इथल्या धनगर गवळी समाजाची दसऱ्याची सुरुवात घटस्थापनेच्या दिवशी होते. पहिल्या दिवशी घरातील देव्हाऱ्यात कुलदेवतेचे पूजन केले जाते आणि नंतर नऊ दिवस रात्री गजा नृत्य, फुगडी घालून रात्री जागवल्या जातात. या कुलदेवतेच्या पूजनाच्या माथ्यावर माटोळी बांधण्याची परंपरा आहे. या माटोळीला नारळ आणि जंगलातील रान फळे-फुले बांधण्याची परंपरा आहे . नवव्या दिवशी घराच्या बाहेर पाटी पूजनाचा विधी होतो. त्या रात्री आपल्या वस्तीवरील समाज बांधव प्रत्येक घरोघरी फिरून गजा नृत्य सादर करतात. ढोल आणि थाळीच्या गजरात हे विशिष्ट प्रकारचे आहे. या नृत्यात पायांचा ताल आणि हातांचे हातवारे हे मुख्य आकर्षण असते. तर नृत्य करीत असताना 'हरे गजा चांगभलं' हे वाक्य विशिष्ट लयीत म्हणतात.

- **चपई नृत्य**

कोकणी/गवळी आणि धनगर जातीचे प्रसिद्ध विधीनृत्य चपई होय. चपई नृत्य हा कोकणातील धनगर जातीचा प्रमुख नृत्य प्रकार आहे. नवरात्रीत देवीची घटस्थापना झाल्यानंतर देवीसमोर हे नृत्य खेळले जाते. तसेच दसऱ्यादिवशी सीमोल्लंघनाला धनगरांचे देव सीमेवर जातात तिथे मांड भरला जातो आणि त्या ठिकाणी मोठ्या उत्साहात हे नृत्य खेळले जाते. नवरात्रीपासून दसऱ्यापर्यंत आणि दिवाळी या सणांना हे नृत्य केले जाते. देवतांना केलेल्या नवसाची परतफेड म्हणूनही चपईनृत्य खेळविले जाते त्याला पवा खेळविणे असे म्हणतात. चपई नृत्य खेळत असताना “हार हार चांगभलं” आणि “भली ग भली ग व्हयी” असा जयघोष सुरु असतो. प्रथम संथ लयीत चालणारे हे नृत्य हळूहळू द्रुततलय पकडते आणि मगखेळगड्यांची चपळता दिसून येते.

चपई नृत्याची वेशभूषा : चपई खेळणारे खळगडी अंगात पायगोळ झगा घालतात. डोक्याला फेटा बांधतात. कमरेला कमरबंध / कमरशेला बांधतात. हातात वेताची छडी आणि पायात वाक्या असतात. कपाळाला भंडारा लावतात. डोक्यास फेटा / पागोटे बांधल्याखेरीज कोणीही खेळगडी खेळत नाही.

वाद्ये : चपई नृत्यासाठी एका बाजूला शेळीचे आणि दुसऱ्या बाजूला गायीचे कातडे लावलेला ढोल वाजवितात. मुरलीचे सूर सूरावट देतात.

चपईनृत्याला गजा किंवा गजनृत्य म्हणून संबोधतात. गजनृत्य आणि चपई नृत्य यांत काही भेद आहेत. मात्र चपईनृत्याचे मूळ स्त्रोत हे गजनृत्यच आहे. चपई नृत्य फक्त गवळी / कोकणी धनगर जातीपुरते मर्यादित असून महाराष्ट्राच्या ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात तसेच गोवा राज्य आणि कारवार प्रांतात वास्तव्य करून असलेला धनगर समाज हे नृत्य सादर करतो.

- **"हालमत संस्कृती", धनगरी परंपरा : हेडाम नृत्य**

हालमत(हलूमथ) हा धर्म आहे. हा शब्द मूळ कन्नड शब्दातून आला आहे.हाल म्हणजे दूध, मत म्हणजे पवित्र/शील, असा हा पवित्र हालमत धर्म दुधापासून निर्माण झाला आहे, असं हालमत पुराण सांगत. याच धर्मामध्ये अनेक सांस्कृतिक रूढी-परंपरा जपल्या जात

आहेत. या धर्मा मध्ये अफाट भक्ती केली जाते. त्यामध्ये श्री. बिरोबा, महालिंगराया सुऱ्याबा, जकराया विठोबा, म्हाळोबा, म्हसकोबा इ. श्रद्धास्थाने आहेत. ही लोक दैवते प्रथम पूजनीय आहेत. याच देवांची भक्ती करत असताना, धनगरी धर्माला लाभलेली एक संस्कृती म्हणजे हेडाम होय.

**हेडाम:-** हेडाम हा खेळ नेमका कोणी पहिला खेळाला हे सांगणं थोडं कठीण आहे. श्री. बिरदेव यांचे दोन शिष्य होऊन गेले, एक सुऱ्यापा आणि दुसरा महालिंगराया या दोन शिष्यानी हेडाम खेळलं होतं, हे सांगितलं जातं. पण पहिलं कोणी खेळलं असावं या विषयी मतभेद आहेत.

**हेडाम कोण खेळतं ?:-** धनगरी धर्मामध्ये ज्या व्यक्तीला देवाशी एकरूप केलं जाते, म्हणजे (कंकण बांधतात त्यास देवर्षी अस म्हंटल जातं) ती व्यक्ती हेडाम खेळत असते. हेडाम खेळत असताना त्यांच्या बरोबर बावन्न-बिरुद, ढोल-कैताळ यांच्या वाद्यात तल्लीन होऊन, हेडाम खेळणारा देवर्षी श्री.बिरुदेवाशी, (आपल्या गुरूशी) एकरूप होऊन,जीवाची आणि शिवाची भेट करून, हातात जोड हत्यार घेऊन तलवार पोटावर मारून घेतो.

**हेडाम खेळण्याचे प्रकार:-** तलवार पोटावर मारून घेणे, वेताची काठी पोटावर मारून घेणे. तसेच, हेडाम कसं खेळावे हा ज्या त्या हेडम्या (व्यक्तीवर) अवलंबून असतं. हेडाम खेळणाऱ्या व्यक्तीची पाळणूक (उदा, मांसाहार जेवण न करणे, माती , उत्तरकार्य या ठिकाणी भोजन न करणे, डबल कडवलेले जेवण न करणे ) अश्या अनेक गोष्टींची पाळनुक करावी लागते.

**हेडाम नृत्य हे कधी खेळले जाते:-** धनगरी धर्मा मध्ये श्री. बिरदेवाची जळ-परडी सोडणे कार्यक्रम असेल, त्या वेळी खेळलं जाते. काही ठिकाणी वर्षाची यात्रा असते त्या वेळी जर वर्षी नित्यनेम असतो त्या वेळी पण हेडाम खेळलं जात .धनगरी धर्मात एखाद्याच लग्न असेल तर जक्यार काढताना हेडाम खेळलं जात. धनगरी धर्मा मध्ये ही कला-परंपरा अगदी मोलाची आहे.

**समारोप -**

धनगर समाज रानावनातून मेंढ्या घेऊन भटकंती करणारा समाज आहे. दिवसभराच्या कामातून विरंगुळा व आपल्या संस्कृतीची जपवणूक करण्यासाठी विविध नृत्य व गाणे समाजाने जपून ठेवली आहे. त्यामुळे त्यांच्या लोककलेतून एक वेगळी संस्कृती स्पष्टपणे दिसून येते. पिढ्या आणि पिढ्या ही लोककला या समाजाकडून जोपासले जाते आहे. औषधी युक्त शेळया मेंढ्याच दुधातुन आलेली कटाक निरोगीपणा मेंढ़पाळीतुन भटकंती त्यातून ज्ञान प्रदेशाची माहिती त्यामुळे सैन्यातील मोठा सहभाग हे धनगर समाजाचे वैशिष्ट्य राहिले आहे .हलमता प्रमाणे चालणारा हा समाज सत्यवचनी ,प्रमाणिक ,लढाऊ, देवभोळा ,नागरी रीतीरिवाजापासून दूर ,दिल्या बोलाला जागणारा, समाज म्हणून प्रसिध्द आहे . जागतिकीकरण व अधिकार आधुनिकीकरणाच्या कचाट्यातून सुद्धा त्यांनी आपले एक वेगळा वेगळेपण जपले आहे. या समाजाचे गजानृत्य ओव्या सण उत्सवामध्ये सादर केले जाणारे कार्यक्रम हे त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण स्पष्ट करतात. हे सर्व लिखित स्वरूपात जपून ठेवण्यात आलेले नाही फक्त मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते चालवले जात आहे.

**संदर्भ**

१ मांडे, प्रभाकर - लोकरंगभूमी परंपरा, स्वरूप आणि भवितव्य, मधुराज पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

२ गजीढोल – धनगरी नृत्यप्रकार लेखक - लक्ष्मण साठे

३. गजानृत्य - लेखक – प्रा. वैभव साटम.

४. दैनिक गोमन्तक Published on : 16 Oct, 2021

५. https://m.facebook.com/238122116262774/posts/269401793134806/
६. माहिती संदर्भ - 'सुंबरान मांडिलं' - डॉ.श्री.सुधीरजी तारे
७. मुक्त व्यासपीठ"हालमत संस्कृती", - शाहीर संतोष जाधव. मु.पो.-येलूर. ता- वाळवा, जि. सांगली.
८. http://dhangarsamaj.blogspot.com/2011/ डॉ.प्रकाश खांडगे